कॉलेज कट्टा

# 'उत्साह खेळाडू वृत्तीचा'

प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या मोशीतील मॉडर्न कॉलेज ऑफ फार्मसी महिला महाविद्यालयात दोन दिवस क्रीडा दिन साजरा केला. त्यानिमित्त 'उत्साह खेळाडू वृत्तीचा' उपक्रम राबविला. त्यात बॅडमिंटन, चेस, कॅरम, क्रिकेट व थ्री लेग असे खेळ झाले. प्राचार्य, उपप्राचार्यांच्या उपस्थितीत उद्घाटन झाले. क्रिकेट स्पर्धेत फर्स्ट इयर बी फार्म विजते ठरले. उपविजेतेपद सेकंड इयर बी फार्मच्या विद्यार्थ्यांनी पटकावले. बुद्धिबळामध्ये प्रथम क्रमांक अंजली हांडे, द्वितीय क्रमांक मंजुश्री जाधव हिचा आला. थ्री लेग स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक केतकी जाधव व श्वेता कानडे; द्वितीय क्रमांक हर्षिता परब व नंदिनी डांगरा यांनी पटकावला. बॅडमिंटनमध्ये विजेती सृष्टी वेलानी व उपविजेती समृद्धी पोटगन ठरली. कॅरम स्पर्धेमध्ये विजेतेपद अनुजा गुरवने पटकावले. उपविजेतेपदी आस्था ढोकणे ठरली. त्यांना प्रमाणपत्र देऊन गौरविले.



# 'माझी मायबोली मराठी'चे गोडवे

■ अश्विनी डफळ/ऋतुजा लोहार (मॉडर्न कॉलेज ऑफ फार्मसी महिला)

प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या मोशीतील मॉडर्न कॉलेज ऑफ फार्मसी महिला येथे मराठी भाषा गौरव दिनानिमित्त विविध कार्यक्रम झाले. 'माझी मायबोली मराठी' विषयावर वक्तृत्व स्पर्धा झाली. उपप्राचार्य वृषाली तांबे यांच्या हस्ते कुसुमाग्रजांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. प्रा. भाग्यश्री परांडे व प्रा. प्राजक्ता कोथावडे यांनी परीक्षण केले. अश्विनी डफळ व धनश्री ढवळे यांनी सूत्रसंचालन केले. विद्यार्थ्यांनी प्रतिसाद देत 'मायबोली मराठी'बाबत उत्कृष्ट सादरीकरण केले. नम्रता वाघ (प्रथम), श्रुती भागवत (द्वितीय) यांनी पारितोषिक पटकावले.

# सतरंग २०२४ मध्ये सांस्कृतिक कार्यक्रमांची मैफील

'सतरंग- २०२४' वार्षिक सांस्कृतिक कार्यक्रमाचा प्रारंभ गणेशवंदनेने झाला. प्राचार्य डॉ. शशिकांत ढोले आणि उपप्राचार्य डॉ. वृषाली तांबे यांच्या हस्ते दीपप्रज्वलन झाले. विद्यार्थिनींनी विविध नृत्य, नाटक, गायन करत कलागुणांचे दर्शन घडविले. मृण्मयी भोसले यांनी सूत्रसंचालन केले. विद्यार्थिनींनी पोवाडा, देवीचा गोंधळ, भारूड सादर करून अभिनयही केला. विजेत्यांना प्रमाणपत्र प्रदान करून गौरविले. सांस्कृतिक कार्यक्रमामुळे विद्यार्थिनींमधील कलागुणांना वाव मिळाल्याचे प्राचार्यांनी सांगितले.

College events- Annual Gathering, Marathi Language day, Sports Activities published in Daily Sakal Newspaper.

पिंपरी-चिंचवड TODAY पुणे, सोमवार, ११ मार्च २०२४



# कर्तृत्ववान महिलांचा सन्मान

▪ ऋतुजा लोहार/अश्विनी डफळ (मॉडर्न कॉलेज ऑफ फार्मसी फॉर लेडीज, मोशी)

आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त मोशीतील पीईएस मॉडर्न कॉलेज ऑफ फार्मसी (फॉर लेडीज) येथे विविध कार्यक्रम झाले. सर्व शिक्षिका आणि विद्यार्थिनींचा सहभाग होता. प्रथम वर्षाच्या विद्यार्थिनींनी (फार्म.डी) संयोजन केले. प्राध्यापिकांचा पुष्पगुच्छ देऊन सन्मान केला. उपप्राचार्य डॉ.वृषाली तांबे यांच्या हस्ते दीपप्रज्ज्वलन झाले. 'महिलांच्या आरोग्य समस्या आणि विविध क्षेत्रांतील त्यांची बलस्थाने' या विषयावर भाषणे झाली. नृत्य प्रदर्शन आणि प्राध्यापिका, सदस्यांसाठी विविध खेळांचा देखील समावेश होता. आयुष्यात महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या सर्व महिलांचे आभार मानले आणि एकमेकांना आधार देऊन समाजात पुढे जाण्याचा संदेश देण्यात आला.

**Women's Day celebration at college, published in Daily Sakal Newspaper**



सकाळ

# 'गेट' परीक्षेत कादंबरी, नेहाची भरारी

कादंबरी हंकारे — नेहा जाधव

■ ऋतुजा लोहार / अश्विनी डफळ (मॉडर्न कॉलेज ऑफ फार्मसी महिला, मोशी)

मोशी येथील पीईएस मॉडर्न कॉलेज ऑफ फार्मसीच्या (फॉर लेडीज) कादंबरी हंकारे आणि नेहा जाधव या विद्यार्थिनींनी ग्रॅज्युएट ॲप्टिट्यूड टेस्ट इन इंजिनिअरिंग (गेट) परीक्षा उत्तीर्ण केली आहे. भारतीय विज्ञान संस्था (आयआयएससी)द्वारे आयोजित गेट परीक्षा देशातील पदव्युत्तर अभियांत्रिकी आणि विज्ञान अभ्यासक्रमांमध्ये प्रवेशासाठीची राष्ट्रीय स्तरावरील प्रवेश परीक्षा आहे. विद्यार्थिनींच्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल प्राचार्य डॉ. शशिकांत ढोले आणि उपप्राचार्या डॉ. वृपाली तांबे यांनी त्यांचे अभिनंदन केले. त्यांना पुढील कारकिर्दीसाठी शुभेच्छा दिल्या आणि येणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी त्या प्रेरणा असल्याचे सांगितले.

कॉलेज कट्टा

**Successful students in the GATE exam got appreciation by the Daily Sakal Newspaper**

२२ एप्रिल २०२४ सकाळ

# प्री-प्लेसमेंट शिबिर उत्साहात

**ऋतुजा लोहार (मॉडर्न कॉलेज ऑफ फार्मसी महिला, मोशी)**



प्रो. ए. सो.चे मॉडर्न कॉलेज ऑफ फार्मसी (महिलांसाठी) मोशी येथे बी. फार्मसी, एम. फार्मसी, डी. फार्मसीच्या विद्यार्थिनींसाठी प्री-प्लेसमेंट शिबिर ओपेक्स प्रायव्हेट लिमिटेड कंपनीच्या सहयोगाने महाविद्यालयात झाले. ॲप्टिट्यूड टेस्ट, इंटरव्ह्यू स्किल, कम्युनिकेशन अँड सॉफ्ट स्किल्स आदींबाबत विश्वजीत काशीद (आंतरराष्ट्रीय वक्ता आणि समुपदेशक, ओपेक्स एक्सेरेलेटर) यांनी मार्गदर्शन केले. महाविद्यालयाच्या ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभागाचे अधिकारी प्रा. डॉ. राहुल शिवरकर, प्रा. धनश्री कड यांनी प्राचार्य डॉ. शशिकांत ढोले यांच्या मार्गदर्शनाखाली शिबिर घेतले.

**The Pre-placement workshop at MCPL was recognised in the Daily Sakal Newspaper**